नियमित दिवाणी दावा क्र.८८/२०१५

## अर्ज नि. ४५ खालील आदेश.

बाळासो सुतार वगैरे विरुध्द बंडू सुतार वगैरे

१. प्रस्तुतचा दावा, वादींनी कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज, प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे क्रम ६ नियम १७ अन्वये कैफियतीत दुरुस्ती आणण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जातील प्रतिवादींचे थोडक्यात कथन असे आहे की, दिनांक १३.०७.२०१५ रोजी सदर प्रतिवादींनी मुळ दाव्यास कैफियत व प्रतिदावा दाखल केला आहे. कैफियतीमध्ये नजरचुकीने व टंकलिखित दोषामुळे काही ठिकाणी 'पूर्वेला ' या ऐवजी ' पश्चिमेला' असे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे कैफियतीमधील परिच्छेद क्र.१३ मधील तिस-या ओळीला बोळ रस्त्याच्या ' पश्चिमेला ' या ऐवजी ' पूर्वेला ' असा मजकुर; परिच्छेद क्र.१३ मधील चौदाव्या ओळीतील बोळ रस्त्याच्या 'पश्चिमेला ' या ऐवजी ' पूर्वेला ' असा मजकुर; तसेच याच परिच्छेदामधील सोळाव्या व सतराव्या ओळीतील बोळ रस्त्याच्या ' पश्चिमेला ' या ऐवजी ' पूर्वेला ' असा मजकुर समाविष्ट करण्याची परवानगी वादींना देण्यात यावी. प्रस्तावित दुरुस्तीमुळे वादींचे कोणतेही नुकसान होणार नसून, ती औपचारिक स्वरुपाची आहे. परंतु, तसे न झाल्यास, प्रतिवादींचे नुकसान होणार आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही अंतिम न्यायनिर्गतीसाठी महत्वाची असून, ती मंजूर करण्याने कैफियतीच्या मूळ रचनेत अथवा स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. कायदेशीर गुंतागूंत टाळण्यासाठी अर्ज मंजूर करण्यात यावा. इत्यादी बाबी नमूद करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर वादींनी आपले म्हणणे सादर करुन, अर्जातील कथनांना विरोध दर्शविला आहे. प्रस्तुत वादींचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जातील मजकूर मान्य व कबूल नाही. प्रस्तावित दुरुस्ती ही टंकलिखित दोषामुळे करावी लागत आहे असे म्हणता येणार नाही. प्रतिवादी हे कैफियतीमधील दिलेली कबूली तथ्ये काढून घेवू पहात आहेत. तशी कायदयाने परवानगी देता येणार नाही. वादींनी प्रस्तुत प्रतिवादींच्या प्रतिदाव्यास दिलेल्या कैफियतीमध्ये या सर्व गोष्टींचा खुलासा करुन बचाव घेतलेला आहे. त्यामुळे प्रस्तावित दुरुस्ती मंजुर झाल्यास, वादींचे अतोनात नुकसान होणार आहे. प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास विलंब केलेला आहे. इत्यादी सर्व बाबी नमूद

करुन प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी मागणी वादींनी केली आहे.

४. वाद–प्रतिवाद कथनावरुन खालील मुद्दे माझ्या विचाराधीन उपस्थित झाले. ते मुद्दे सबळ कारणास्तव निष्कर्षासह खालीलप्रमाणे आहेत.

| | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | प्रस्तावित दुरुस्ती ही पक्षकारांमधील खराखुरा वाद अंतिमतः निर्णित करण्यासाठी आवश्यक आहे काय ? | ... | होय. |
| २. | प्रस्तावित दुरुस्ती मंजूर केल्यास कैफियतीचे मूळ स्वरुप बदलणार आहे काय ? | ... | नाही. |
| ३. | प्रस्तावित दुरुस्ती मंजूर झाल्यास वादींचे न भरुन येणारे नुकसान होणार आहे काय ? | ... | नाही. |
| ४. | अंतिम आदेश काय ? | ... | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमीमांसा

**मुद्दे क्रमांक १ ते ३ करीता** :

५. सदरील मुद्दे परस्परांशी निगडीत असल्याने, त्यांचे विवेचन एकत्रीतपणे करण्यात येत आहे. प्रतिवादींतर्फे सुविद्य विधीज्ञ श्री. पी.आर. भेंडवडे व वादींतर्फे सुविद्य विधीज्ञ श्री. डी.डी. मगदुम यांनी केलेला संपूर्ण युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाच्या न्यायनिर्णयाच्या कामी मी खालील न्यायनिवाडयातील मार्गदर्शक तत्वे विचारात घेतली आहेत.

In **Quality Polly Closures Vs. Ex. Engineer, MSEB, Satara, 2001 (1) Mah. L. R. 89**, in which the Hon'ble Apex Court held that -

*'The purpose and object of Order 6, Rule 17 of Civil Procedure Code is to allow either party to alter or amend his pleadings in such manner and on such terms as*

*may be just. Mere delay cannot be a ground to reject the amendment. The power to allow the amendment is wide and can be exercised at any stage of the proceedings in the interest of justice on the basis of guidelines led down by the Supreme Court and various High Courts. It is true that the amendment cannot be claimed as a matter of right and under all circumstances. But it is equally true that the courts while deciding such prayers should not adopt hyper-technical approach. Liberal approach should be the general rule particularly in cases where the other side can be compensated with the costs. Technicalities of law should not be permitted to hamper the courts in the administration of justice between the parties. Amendments are allowed in the pleadings to avoid uncalled for multiplicity of litigations.'*

*In **Rajesh's Case Law A.I.R. 2006 Supreme Court 1647**, the Hon'ble Apex Court held that, ' The Court should not go into correctness or falsity of the case in amendment. '*

६. कायदयातील हे सर्वमान्य तत्व आहे की, दिवाणी प्रक्रिया संहितेचे क्रम ६ नियम १७ अन्वये पक्षकारामधील एखादया प्रकरणातील खराखुरा वाद अंतिमतः निकाली काढण्याकरीता अभिकथनामध्ये आवश्यक ती दुरुस्ती पक्षकारांना अभिलेखावर आणता येते. सदरील दुरुस्ती मंजूर करणे अगर न करणे हा स्वेच्छाधिकार त्या न्यायालयाचा आहे. परंतु, न्यायाच्या दृष्टीकोनातून पक्षकारांच्या हितासंबंधी आवश्यक असलेली प्रस्तावित दुरुस्ती न्यायालयाने मंजूर करणे आवश्यक असते. वर नमुद न्यायनिवाडयातील मार्गदर्शक तत्वावरुन असे दिसून येते की, प्रकरणात कोणत्याही स्थितीस पक्षकारांना आवश्यक ती दुरुस्ती अभिकथनामध्ये आणता येवू शकते आणि त्यासाठी विरुध्द पक्ष प्रस्तावित दुरुस्तीसाठी अर्ज उशिरा दाखल केला आहे असा बचाव घेवू शकत नाही. परंतु अशी दुरुस्ती ही दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयासाठी आवश्यक असणे गरजेचे आहे.

७. मुळ दावा हा प्रतिवादींविरुध्द कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळणेसाठी

दाखल करण्यात आला आहे. कायदयातील हे सर्वमान्य तत्व आहे की, दिवाणी कामकाजामध्ये प्रतिवादीकडून दिवाणी प्रक्रिया संहितेचे क्रम ६ नियम १७ अन्वये प्रस्तावित दुरुस्तीसाठी दाखल होणा–या अर्जाची अंतिम निर्गंती करीत असताना न्यायालयाने उदारमतवादी असायला हवे कारण अशा प्रकरणांमध्ये त्यातील वादीचे अर्ज मंजूर करण्याने नुकसान होण्याची अतिशय कमी शक्यता असते. सदरील तत्वास अनुसरुन नि.४५ वरील नमुद केलेली प्रस्तावित दुरुस्ती पहाता आणि कैफियतीतील मूळ कथने पहाता, प्रस्तावित दुरुस्तीमुळे मूळ कैफियतीत मोठया प्रमाणावर बदल होणार असल्याचे व संपूर्ण बचाव त्यामुळे बदलला जाणार असल्याचे कोठेही दिसून येत नाही. वादींनी प्रस्तुत अर्जाकरीता दिलेल्या म्हणण्यावरुन, अर्ज मंजूर करण्याने त्यांचे अतोनात असे काय नुकसान होणार आहे याबाबतचे स्पष्टीकरण त्यांचेकडून आलेले नाही. किंबहुना प्रस्तावित दुरुस्ती ही उभय पक्षकारांमधील वादाचे अंतिमतः निराकरण करण्यासाठी आवश्यक असल्याचे दिसून येते. अर्ज नामंजूर करण्याने प्रस्तुत प्रतिवादींचेच नुकसान होणार असल्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करावा लागेल. परंतु, प्रस्तावित दुरुस्ती अभिलेखावर आणणेस प्रतिवादींनी केलेला विलंब पहाता, त्यांचेवर रक्कम रुपये ५००/– खर्च आकारुन व खर्चाची रक्कम वादींना देवू करणेचा आदेश केल्यास न्यायोचित होईल. करीता वरील विवेचनावरुन मुद्दा क्रमांक १ याचा निष्कर्ष होकारार्थी व मुद्दा क्रमांक २ व ३ यांचे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येतो. मुद्दा क्रमांक ४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज, प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचेकडून वादींना रुपये ५००/– (रुपये पाचशे ) फक्त खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तावित दुरुस्ती प्रतिवादींनी हा आदेश झाल्यापासून ७ (सात ) दिवसांचे आत कैफियतीत करुन घ्यावी.

३. अर्ज वरीलप्रमाणे निकाली काढण्यात येतो.
(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

सही/–

दिनांक २१ ऑगष्ट , २०१५

( आर. आर. काळे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कुरुंदवाड.

I affirm that the contents of this P. D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | S.K.Yadav, Stenographer (L.G.) |
| Name of the Court | Civil Court Jr. Dn., Kurundwad. |
| Date of Dictation | 21.08.2015 |
| Order signed by the P. O. on | 21.08.2015 |
| Order uploaded on | 24.08.2015 |